HELLO लोकमत
परभणी शनिवार, दि. ६ नोव्हेंबर २०१० पृष्ठे :

# एचआयव्हीबाधित अनाथ मुलांसमवेत दिवाळी

**परभणी, (प्रतिनिधी)**- होमिओपॅथीक अकादमी ऑफ रिसर्च ॲण्ड चॅरीटीज् तर्फे 'जीवनरेखा बालगृह' येथे दिवाळीनिमित्त कार्यक्रम घेण्यात आला.

या अनाथ मुलांना पोषक आहार, फळे, मच्छरदानी, शैक्षणिक साहित्य, मिठाई, दिवाळीचे साहित्य, दिवे, पणत्या, औषधी व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. होमिओपॅथीक अकादमीचे डॉ.पवन चांडक यांनी प्रास्ताविकात सांगितले, अज्ञान, निरक्षरता, एकटेपणा, सामाजिक दुर्लक्षता, आरोग्याच्या समस्यारूपी काळोख दिवाळीरूपी प्रकाशाने नाहीसा करण्यासाठी एच.ए.आर.सी. तर्फे २००८ पासून आम्ही दिवाळी साजरी करतो. या अनाथ मुलांच्या आनंदात मिसळून दिवाळी साजरी करण्याची ही परंपरा आजपर्यंत अखंडित असून, यापुढेही ती सुरूच ठेवण्याचा मानस त्यांनी बोलून दाखविला. दिवाळीबरोबरच बालदिन, जागतिक एड्स दिन, नवीन वर्षही या मुलांसमवेत साजरे करण्यात येतात. यानिमित्ताने या अनाथ मुलांचे पुनर्वसन व्हावे, असा आमचा उद्देश असल्याचे डॉ. चांडक यांनी सांगितले. या कार्यासाठी प्रत्येकाने मदतीचा हात द्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमास डॉ. दरक, जीवनरेखा बालगृहाचे अध्यक्ष जावेद फारुकी यांची उपस्थिती होती. यशस्वीतेसाठी डॉ. आशा चांडक, जांगीड, विशाल तोष्णीवाल, श्यामा चांडक, चंचल मराठे, विजय चांडक, श्रीकांत उबाळे आदींनी परिश्रम घेतले.